# विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २००३ च्याकलम ४२(६) अंर्तगत)

अभिवेदन (Representation) क्रमांक ८० / २०२४

नवीन वीज जोडणी मिळण्याबाबत

शिवाजी मारूती लेंडघर .................................................. अपिलार्थी

विरूध्द

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, राजगुरूनगर (महावितरण) .................................................. प्रतिवादी

उपस्थिती :-

अपिलार्थीतर्फे :- १) शिवाजी मारूती लेंडघर, स्वतः
२) योगेश शिवाजी लेंडघर, मुलगा

प्रतिवादीतर्फे :- १) राजेंद्र एडके, कार्यकारी अभियंता
२) विजय गारगोटे, उपकार्यकारी अभियंता

कोरम :- वन्दना कृष्णा (भा.प्र.से. निवृत्त)

सुनावणी तारीख :- ५ जून २०२४

आदेश पारित दिनांक :- ३१ जुलै २०२४

## आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २०२० (ग्राहक गाऱ्हाणे विनियम २०२०) मधील विनियम १९.१ अन्वये ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, महावितरण, पुणे परिमंडळ, (मंच) यांच्या दिनांक १३ फेब्रुवारी २०२४ च्या आदेशाविरूध्द अपिलार्थीने सदर अभिवेदन दिनांक १६ एप्रिल २०२४ रोजी दाखल केले आहे. मंचाने त्यांच्या दिनांक १३ फेब्रुवारी २०२४ च्या आदेशान्वये अपिलार्थीचे गाऱ्हाणे अंशतः मान्य केले व खालीलप्रमाणे निर्देश दिले.

- प्रतिवादींना विलंब आकार व वीज पुरवठा कायमस्वरूपी खंडीत केलेल्या वीज देयकावरील आकारलेले व्याज (ग्राहक क्रमांक १७७५१४२२२२६३) माफ करण्याचे निर्देश दिले.
- अपिलार्थीने आदेशातील अनुक्रमांक २ ची पुर्तता केल्यानंतर प्रतिवादींनी अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत नवीन वीज जोडणी देण्यात यावी.

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

२.	अपिलार्थीने त्यांच्या निवेदनातील व दिनांक ३० मे २०२४ रोजीच्या व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे झालेल्या सुनावणी दरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे.

- अपिलार्थी हे राहणार नाणेकरवाडी, पोष्ट चाकण, तालूका खेड, पुणे येथे नवीन वीज जोडणीसाठी दिनांक २० एप्रिल २०२३ रोजी महावितरण कार्यालयाकडे हमीपत्रासह ऑनलाईन अर्ज केला. सदर अर्जाचा पाठपुरावा केला असता, अपिलार्थीच्या नावे ग्राहक क्रमांक १७७५१४२२२२६३ ची वीज जोडणी असून त्याची थकबाकी असल्याचे निदर्शनास आल्याने नवीन वीज जोडणी देण्यात आली नाही; असे अपिलार्थीस कळविले. अपिलार्थीने नमुद केले की, यापूर्वी नवीन वीज जोडणीसाठी त्यांनी कोणताही अर्ज केलेला नाही.

- त्यानंतर, दिनांक १७ ऑगष्ट २०२३ रोजी माहिती अधिकार २००५ अंतर्गत सदर ग्राहक क्रमांकाबाबत महावितरण कार्यालयाकडे त्या वीज जोडणीसाठीच्या अर्जासोबत जोडलेले हमीपत्र, ७/१२ व ८ अ चा उतारा, ए-१ फॉर्म, तपासणी अहवाल व टेस्ट रिपोर्टची मागणी केली. त्यावर उपकार्यकारी अभियंता चाकण उपविभाग यांनी शाखा कार्यालयात याबाबतचे कोणतेही कागदपत्रे उपलब्ध नसल्याचे कळविले.

- दिनांक १३ फेब्रुवारी २०२४ रोजी मंचाकडे तक्रार दाखल केली. मंचाकडे झालेल्या सुनावणी दरम्यान मंचाने प्रतिवादीस ८ दिवसांत अपिलार्थीच्या तक्रारीचे निराकरण करा, असे निर्देश दिले; अन्यथा, ८ दिवसांनंतर अपिलार्थीस पुन्हा मंचाकडे येण्याचे सांगितले. दरम्यानच्या कालावधीत याबाबत प्रतिवादींकडे पाठपुरावा केला असता, त्यांनी काहीही प्रतिसाद दिला नाही व उडवाउडवीची उत्तरे दिली. प्रतिवादीने तक्रारीचे निराकरण केले नाही, म्हणून पुन्हा मंचाकडे तक्रार दाखल केली. मंचाच्या आदेशाने समाधान झाले नाही, म्हणून सदरचे अभिवेदन मा. विद्युत लोकपाल कार्यालयाकडे केले आहे.

- अपिलार्थीने नमुद केले की, त्यांच्या नावावर फेक वीज जोडणी असून त्याबाबतचे कोणतीही कागदपत्रे अस्तीत्वात नाहीत. मात्र, पी.डी वीज देयक अपिलार्थीच्या नावावर आहे. दिनांक २८ जून २०१३ रोजी ग्राहक क्रमांक १७७५१४२२२२६३ च्या नावे थकीत वीज देयक रक्कम रु.२,६१,२६७.१२ व त्यावरील व्याज रक्कम रु.८२७५.१५ असे एकूण रु.२,६९,५४२.२७ या देय रक्कमेचा भरणा करण्याची नोटीस आली असता, त्या नोटीसीस दिनांक ७ सप्टेंबर २०१३ रोजी उत्तर दिले; की, सदर ग्राहक क्रमांकाचे मीटर अपिलार्थीस बसविलेले नसून व ते अस्तित्वातच नाही. याबाबत महावितरणकडे चौकशी केली असता, त्यांनी तोंडी सांगितले की, तुमच्यावर कोणतीही कारवाई होणार नाही व सदर मीटर कनेक्शन डिलीट करण्यात येईल, परंतू तसे काही झाले नाही.

Electricity Ombudsman Mumbai, M.E.R.C.

- अपिलार्थीने नमुद केले की, त्यांचा मुलगा योगेश शिवाजी लेंडघर यांनी नवीन वीज जोडणीसाठी अर्ज केला असता; त्यास, विना हरकत नवीन वीज जोडणी देण्यात आली. सदर वीज जोडणी सुरळीत चालू असून त्याचा वीज देयक भरणा नियमित चालू आहे. परंतू माझी सून सौ. पुनम योगेश लेंडघर हिने नवीन वीज जोडणीसाठी अर्ज केला असता, तुमचे सासरे शिवाजी मारुती लेंडघर यांच्या नावे पी.डी वीज जोडणी असल्याने तुम्हाला वीज जोडणी मिळणार नाही; असे कळविले. अपिलार्थीने नमुद केले की, जर, अपिलार्थीच्या नावे थकीत वीज देयक असेल, तर शासनाने कारवाई का केली नाही?.

- सन २०१० पासून आजता गायत लोक अदालत कडून त्यांना कोणतीही नोटीस जारी केलेली नाही परंतू, महावितरणने मात्र वीज जोडणी नाकारल्यानंतर दिनांक १४ फेब्रुवारी २०२४ रोजी लोक अदालचे समन्स येते व अपिलार्थीच्या नावावर असलेल्या फेक पी.डी मीटर संदर्भात पैसे भरण्याबाबत विचारणा होते, हे संयुक्तिक नसून अन्यायकारक व जाणून बुजून मानसिक त्रास देण्यासारखे आहे.

- अपिलार्थीने मा. विद्युत लोकपाल कार्यालयाकडे खालील प्रमाणे मागण्या केल्या आहेत.

  - अपिलार्थी व त्यांची सुन सौ. पुनम योगेश लेंडघर यांस नवीन वीज जोडणी देण्यात यावी.
  - फेक वीज जोडणीवरील थकबाकी रक्कम रद्द करण्यात यावी.
  - अपिलार्थी व त्यांची सुन पुनम योगेश लेंडघर यांना झालेल्या मानसिक व आर्थिक त्रासाबाबत प्रतिवादी महावितरण कंपनीस जास्तीत जास्त दंड आकारण्यात यावा.

३. प्रतिवादीने त्यांच्या निवेदनातील व दिनांक ३० मे २०२४ रोजीच्या व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे झालेल्या सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे आहेत.

- अपिलार्थी हे राहणार नाणेकरवाडी, पोष्ट चाकण, तालूका खेड, पुणे येथे नवीन वीज जोडणीसाठी दिनांक २० एप्रिल २०२३ रोजी महावितरण कार्यालयमध्ये हमीपत्रासह ऑनलाईन अर्ज केला. सदर अर्जाचा पाठपुरावा केला असता अपिलार्थीच्या नावे १७७५१४२२२२६३ या ग्राहक क्रमांकांची वीज जोडणी असून त्याची मागील थकबाकी एकुण रु.२,६५,९४०/- असल्याचे निदर्शनास आल्याने नवीन वीज जोडणी देण्यात आली नाही; असे, अपिलार्थीस कळविले.

- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता, वितरण परवानाधारकांच्या कृतीचे मानके आणि पॉवर क्वालिटी) विनियम २०२१ नुसार खालील नमुद केलेल्या कलमानुसार वीज पुरवठा देण्यात आला नाही.

  *"६.२ परंतू आणखी असे की, ज्या जागेसाठी पुरवठयाची मागणी करण्यात आली आहे त्यावर कोणतीही प्रलंबित देय रक्कम असेल तर, अशी देय रक्कम अदा करण्यात येत नाही तोपर्यंत या संहितेच्या विनियम १२.५ च्या परंतुकानुसार नवीन जोडणी देण्यात येणार नाही.*

*१२.५ कोणत्याही जागेचा मृत ग्राहक किंवा पुर्वीच्या मालक / वहीवाटदाराकडून जसे असेल तसे वितरण परवानाधारकास देय असलेला विजेचा कोणताही आकार किंवा विजेच्या आकाराव्यतिरीक्त अन्य कोणतीही रक्कम त्यास अदा करणे बाकी असेल तर सदर रक्कम, अशा जागेच्या कायदेशीर प्रतिनिधी / कायदेशीर उत्तराधिकारी किंवा नवीन मालक/वहीवाटदार जसे असेल तसे, त्यांना हस्तांतरीत केलेल्या जागेवर येणे आकार म्हणून लागू राहील आणि तो जागेच्या अशा कायदेशीर प्रतिनिधी/कायदेशीर वारस किंवा नवीन मालक/वहीवाटदार, जसे असेल तसे, यांच्याकडून वितरण परवानाधारकास देय व वसुलीयोग्य राहील.*

*१६.१.३ ज्या इमारतीचा पुरवठा कायमस्वरूपी खंडीत करण्यात आला असेल किंवा त्या पुर्नबांधणीसाठी पाडण्यात आला असतील अश्या इमारतींच्या थकबाकीचे दायित्व, असल्यास मालक/वहीवाटदारांवर राहील."*

सबब, महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या कलमानुसार थकबाकी असलेल्या ग्राहकांना नवीन वीज जोडणी देण्यात आली नाही.

४. दिनांक २८ जून २०२४ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिवादींनी असे कळविले की, सदर ठिकाणी अनधिकृतरित्या वीज वापरल्या कारणास्तव वीज कायदा २००३ च्या कलम १२६ अंर्तगत अपिलकर्त्यावर कारवाई करण्यात आली आहे.

<u>विश्लेषण व निर्णय</u>

५. दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकण्यात आले व उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले.

६. अपिलार्थीने नवीन वीज जोडणीसाठी दिनांक २० एप्रिल २०२३ रोजी महावितरण कार्यालयामध्ये हमीपत्रासह ऑनलाईन अर्ज केला. सदर नवीन वीज जोडणी अर्जाचा पाठपुरावा केला असता, अपिलार्थीच्या नावे ग्राहक क्रमांक १७७५१४२२२२६३ ची वीज जोडणी असून त्या ग्राहक क्रमाकांची एकुण थकबाकी रक्कम रु.२,६५,१४०/- असल्याने सदर वीज जोडणी दिनांक २६ सप्टेंबर २०२० रोजी कायम स्वरुपी खंडीत करण्यात आली असल्याचे <u>निदर्शनास आल्याने सदर ठिकाणी नवीन वीज जोडणी देण्यात आली नाही.</u> अपिलार्थीने असे कथन केले की, अपिलार्थी व त्यांची सुन सौ. पुनम योगेश लेंडघर यांस नवीन वीज जोडणी दिली नाही; म्हणून झालेल्या मानसिक व आर्थिक त्रासापोटी प्रतिवादीस दंड आकारण्यात यावा अशी विनंती केली.

७. अपिलार्थीच्या नावे असलेली वीज जोडणी ग्राहक क्रमांक १७७५१४२२२२६३ दिनांक २८ जून २०१३ रोजी दिली व वीज देयकाच्या थकीत रक्कमेचा पोटी सदर वीज जोडणी दिनांक २६ सप्टेंबर २०२० रोजी कायम स्वरूपी खंडीत करण्यात आली (एकुण कालावधी ४ वर्षे २ महिने ३० दिवस) प्रतिवादी यांनी त्यांच्या दिनांक २८ जून २०२४ रोजीच्या पत्रान्वये हे ही स्पष्ट केले आहे की, माननीय विद्युत लोकपाल (मुंबई) यांनी सादर करण्यास सांगितलेली माहिती 'ग्राहक व्यैयक्तिक खातेवही' (CPL) इ. प्रयत्नातीही

उपलब्ध करून देता येत नाही. कारण स्थानिक प्रणाली विश्लेषकांकडे वा मुख्यालयाकडे तो उपलब्ध नाही. याशिवाय ग्राहकाच्या आवारात स्थळतपासणी केली असता, अपिलार्थी हे अनधिकृतरित्या वीजवापर करीत असल्याचे आढळल्याने वीज कायदा २००३ चे कलम १२६ अन्वये अपिलार्थी विरूध्द कारवाई करण्यात आली आहे.

८. अपिलार्थीचे ग्रामीण भागतील वास्तव्य, या कार्यालयाने सादर करावयास सांगितलेला सांख्यिकीय बिलींग तपशील व तो सादर करण्यातील असमर्थतता आणि समोर आलेले पुरावे, तथ्ये विचारात घेता अपिलकर्ता यांचे पि.डी. कनेक्शनचे २८ जून २००६ ते २६ सप्टेंबर २०१० या कालावधीचे बील दरमहा ४५ युनीट प्रमाणे आकारणी करण्याचा सल्ला वजा सुचना प्रतिवादीस देण्यात येत आहे. तथापि, वीज देयकाच्या आकारणीबाबतचा अंतिम निर्णय प्रतिवादींनीच घ्यावयाचा आहे. पीडी रक्कमेबाबतच्या वीज देयकाचे भुगतान पूर्णपणे झाल्यानंतरच वीज जोडणी देण्यात यावी. तथापि, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता, वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके आणि पॉवर क्वॉलिटी) विनियम, २०२१ (विद्युत पुरवठा संहिता, कृतीची मानके विनियम, २०२१) मधील कलम १२.५ चे पालन करणे बंधनकारक आहे. कलम १२.५ खाली प्रमाणे आहे.

*"कलम १२.५*
*कोणत्याही जागेच्या मृत ग्राहक किंवा पुर्वीच्या मालक/वहिवाटदाराकडून, जसे असेल तसे, वितरण परवाना धारकास देय असलेला वीजेचा कोणताही आकार किंवा वीजेच्या आकारा व्यतिरीक्त अन्य कोणतीही रक्कम त्यास अदा करणे बाकी राहीले असेल तर सदर रक्कम, अशा जागेच्या कायदेशीर प्रतिनिधी/कायदेशीर उत्तराधिकारी किंवा नवीन मालक/वहिवाटदार, जसे असेल तसे, यांना हस्तांतरीत केलेल्या जागेवर येणे आकार म्हणून लागू राहील आणि तो जागेच्या अशा कायदेशीर प्रतिनिधी/कायदेशीर वारस किंवा नवीन मालक/वहिवाटदार, जसे असेल तसे, यांच्याकडून वितरण परवानाधारकास देय व वसुली योग्य राहील."*

९. अपिलार्थीचे अभिवेदन फेटाळण्यात येत असुन निकाली काढले आहे.

सही/-
(वन्दना कृष्णा)
विद्युत लोकपाल (मुंबई)

Certified to be a true copy
(Shri D. S. Bumbre)
Secretary

Electricity Ombudsman Mumbai, M.E.R.C.